# कास्ट्राईब शिक्षक संघटना बैठक दि.०४/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | अनेक शिक्षण संस्था आरक्षण डावलून शिक्षण सेवकांच्या नेमणुका करतात. अशा नेमणुकांना मा. शिक्षणाधिकारी मान्यता देतात. यासाठी सन २००४ च्या आरक्षण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. | प्रत्येक प्रवर्गाच्या रोस्टरमधील विहित टक्केवारीनुसार व मा.व.क. कडून तपासणी झाल्याशिवाय कोणत्याही नियुक्तीस मान्यता देण्यात येवू नये. सन २००४ च्या आरक्षण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच आरक्षित पदांवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारास नियुक्ती व मान्यता देण्यात येवू नये. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| २. | आरटीई कायद्यान्वये राज्यात अनेक शिक्षकांची पदे रिक्त होत आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील शिक्षकांना अतिरिक्त ठरवू नये. (सन १९८१ च्या नियमावलीनुसार) | सेवाशर्ती १९८१ मधील तरतुदीनुसार सेवाकनिष्ठ कर्मचाऱ्याला अतिरिक्त ठरविण्यात यावे. अनुशेष पूर्ण होत नसल्यास मागासवर्गीय शिक्षण सेवकांना अतिरिक्त न करणेबाबत सेवाशर्तीमध्ये तरतूद आहे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ३. | शासन परिपत्रक दि. २२ जुलै, २०१६ नुसार पदोन्नतीच्या दोन पदाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी. | या परिपत्रकातील तरतुदीनुसार व वेळोवेळी देण्यात आलेले शासन आदेश, वरिष्ठ स्तरावरील सूचना नुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ४. | पदोन्नतीमधील मागासवर्गीयांचा अनुशेष दूर करावा. | मागासवर्गीयांना डावलून प्रभारी मान्यता दिल्या जातात, ही बाब योग्य नाही. अकारण प्रभारी नेमणुका करण्यात येवू नयेत. सेवाजेष्ठ मागासवर्गीयांना पदोन्नती देण्यात यावी. छोट्या संवर्गाबाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ४. | आरटीई कायद्यान्वये इ. १ ली ते ८ वीपर्यंत २५ टक्के मागासवर्गीय मुलांचे मोफत प्रवेश सर्वत्र ऑनलाईन करावा व त्याची रक्कम संबंधित शाळांना त्वरित मिळावी. | शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी आरटीई कायद्यान्वये इ. १ ली ते ८ वीपर्यंत २५ टक्के मागासवर्गीय मुलांचे मोफत प्रवेश सर्वत्र ऑनलाईन करावेत, यासाठी संबंधित शाळांना परिपत्रक निर्गमित करावे. या प्रवेशाबाबत स्थानिक वर्तमानपत्रे यामार्फत आवश्यक ती प्रसिद्धी द्यावी. तसेच या प्रवेशाची प्रतिपूर्ती वेळेत मिळण्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ५. | शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी पदांची नेमणूक त्वरित करावी. | विभागीय स्तरावर उपशिक्षणाधिकारी रिक्त पदांची माहिती वरिष्ठ स्तरावर कळविली आहे. उपशिक्षणाधिकारी पदावरील नियुक्त्या शासन स्तरावरून केल्या जातात. | शासन स्तरावर | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | २ मे २०१२ नंतर नेमणूक केलेल्या मागासवर्गीय शिक्षणसेवकांना मान्यता द्यावी. | शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या आदेश व सूचना यानुसार शिक्षणाधिकारी यांनी मान्यता प्रकरणी आवश्यक कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ७ | वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी कार्यवाहीबाबत. | राज्यातील इतर विभागात वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी बाबत मान्यतेची कार्यवाही लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक (शिक्षण) यांचेकडून केली जाते. विभागात देखील अशी कार्यवाही करणेबाबत संचालनालयाकडे मार्गदर्शन मागविले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. पुढील सूचना / आदेश प्राप्त होईपर्यंत सध्या शिक्षणाधिकारी यांनी प्राप्त प्रस्ताव त्वरित निर्गत करावेत. | संचालनालय / शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ८ | श्री. जयवंत देवू मधाळे यांच्या पेन्शन मंजूरीसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" पाठविणेबाबत. | या बाबतची कार्यवाही या कार्यालयाकडून व शिक्षणाधिकारी यांचेकडून पूर्ण करण्यात आली आहे. | --- | --- |
| ९ | माहे ३० सप्टेंबर अखेर मागासवर्गीय शिष्यवृत्तीय बाबत. | समाजकल्याण विभागाकडील शिष्यवृत्त्यांबाबत शिक्षणाधिकारी यांनी परिपत्रक काढावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| १० | मागासवर्गीय एस्.एस्.सी व एच्.एस्.सी. परीक्षा फीबाबत. | शासन आदेशानुसार बोर्डाकडून कार्यवाही केली जाते. | बोर्ड स्तरावर | --- |
| ११ | माध्य. अतिरिक्त शिक्षकांना हजर करून घेणेबाबत. | अतिरिक्त शिक्षकांना हजर करून घेणे आवश्यक आहे. अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन होईपर्यंत मूळ शाळेतून वेतन अदा करावे. अतिरिक्त शिक्षकास रूजू करून न घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे वेतन थांबविण्यात येईल व त्यानंतर संबंधित शाळेतील पद व्यपगत करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल. | शाळा स्तरावर | तात्काळ |
| १२ | शालेय वेळ निश्चित कराव्यात, पत्रक काढणेबाबत. | माध्यमिक शाळा संहिता व आरटीई २००९ प्रमाणे शालेय वेळ निश्चित करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| १३ | वैयक्तिक प्रकरणे.<br>(श्रीम.परीट, आदर्श हाय.भामटे) | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार श्रीम. परीट यांचे नियमित वेतनश्रेणीबाबत व अन्य प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न पुन्हा बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर